**पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,**
**पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक – पिन 422003, दुरध्वनी नंबर 0253-2309700**
**E.Mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in**

---

**प्रेसनोट** दिनांक:- ०१/०१/२०२२

# ग्रामीण पोलीसांची ३१ डिसेंबरला रात्री उशिरापर्यंत कारवाई

---

सरत्या वर्षाला निरोप व नववर्षाचे स्वागत करातांना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये तसेच कोव्हीड १९ (ओमिक्रॉन) महामारीचा प्रसार होवु नये म्हणुन प्रशासनाने निर्गमित केलेल्या नियमावली प्रमाणे ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस अधीक्षक श्री. सचिन पाटील यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे जिल्हयातील ४० पोलीस ठाणे निहाय बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हयातील महामार्ग, वर्दळीचे ठिकाणे, चेक पोस्ट इ. ठिकाणांवर बॅरिकेटस् लावुन सतर्क नाकाबंदी करण्यात आली होती. ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह तसेच हॉटेल्स, ढाबे, रिसॉर्ट या ठिकाणांवर पॉईंट लावुन वाहतुक कोंडी आणि सुरक्षात्मक योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात आली. याशिवाय महामार्ग व रस्ते सुरक्षेच्या दृष्टीने सतर्क पेट्रोलिंग ठेवण्यात आली होती. तसेच महिला व मुलींची छेडछाड रोखण्यासाठी साध्या वेशातील पोलीस व महिला पथक तैनात करण्यात आले होते.

बंदोबस्त दरम्यान जिल्हयातील विविध पर्यटन स्थळे, वर्दळीचे ठिकाणे, रिसॉर्ट, हॉटेल्स्, ढाबे, मॉलस् इ. परिसरात करडी नजर ठेवण्यात आली आली होती. जिल्हयातील महामार्ग तसेच वर्दळीच्या ठिकाणांवर लावण्यात आलेल्या नाकाबंदी दरम्यान वाहनांची तपासणी करण्यात आली, रात्री उशिरापर्यंत पथकांकडुन ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह ची कारवाई सुरू होती. अवैधरित्या मद्याची विक्री व वाहतुक करणारे आणि मद्य तसेच हुक्का प्राशन करून बेधुंद अवस्थेत मस्ती करणारे इसमांवरही दारूबंदी व कोटपा कायदयान्वये कारवाई करण्यात आली आहे.

सदर कारवाईत जिल्हयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी ड्रंक अॅन्ड ड्राईव्हच्या एकुण ४१ केसेस केल्या असुन अवैधरित्या मद्याची विक्री व वाहतुक या सदराखाली एकुण १२ केसेस करण्यात आल्या, तसेच अवैधरित्या सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर मा.पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण यांचे पथकाने ०५ तसेच नाशिक तालुका पोलीसांनी ०१ अशा एकुण ०६ केसेस करण्यात आलेल्या आहे. तसेच मालाविरूध्द व शरिराविरूध्दचे गुन्हे करणारे आरोपींवर सी.आर.पी.सी. १०७ प्रमाणे २७६ व सी.आर.पी.सी. ११० प्रमाणे १६ अशा एकुण २९२ प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेल्या आहे.